पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचालित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

संलग्न - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित कार्यक्रम

## वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष २०२३-२४

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | कार्यक्रमाधिकारी - प्रशिक्षणात सहभाग | ४ |
| २ | जागतिक पर्यावरण दिन | ४-५ |
| ३ | जागतिक योग दिन | ५-६ |
| ४ | महाराष्ट्र कृषी दिन | ६-७ |
| ५ | जागतिक लोकसंख्या दिन | ७-८ |
| ६ | राष्ट्रीय सेवा योजन सल्लागार समिती बैठक | ८ |
| ७ | आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी | ८-९ |
| ८ | आपत्ती पूर्व प्रशिक्षण कार्यशाळा | १०-११ |
| ९ | स्वसंरक्षण प्रशिक्षण | ११-१२ |
| १० | क्रांती दिन | १३ |
| ११ | 'मेरी माटी मेरा देश' उपक्रम | १३-१४ |
| १२ | 'हर घर तिरंगा' प्रसिद्धी अभियान | १४ |
| १३ | ध्वजारोहण व 'पंचप्रण शपथ' | १५ |
| १४ | श्रमदान | १५-१६ |
| १५ | राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक नोंदणी व मार्गदर्शन | १६-१८ |
| १६ | स्वातंत्र्य दिन ध्वजारोहण व विरोंको नमन | १९ |
| १७ | मतदार नोंदणी मार्गदर्शन शिबीर | १९-२१ |
| १८ | सद्भावना दिवस – शपथ | २१-२२ |
| १९ | विद्यापीठ वर्धापन दिन | २२ |
| २० | रक्षाबंधन | २३ |
| २१ | शिक्षक दिन – स्वयंशासन दिन | २३-२५ |
| २२ | मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन | २५-२६ |
| २३ | 'अमृत कलश' – माती संकलन | २६-२७ |
| २४ | राष्ट्रीय सेवा योजना दिन | २८ |
| २५ | राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन - राज्यस्तरीय निवड शिबीर सोलापूर - एक स्वयंसेविका सहभाग | २८-३० |
| २६ | गांधी सप्ताह – श्रमदान | ३०-३१ |

| | | |
|---|---|---|
| २७ | महात्मा गांधी व लालबहादूरशास्त्री जयंती | ३२ |
| २८ | सरदार वल्लभभाई पटेल जयंती व इंदिरा गाधी पुण्यतिथी | ३२-३३ |
| २९ | संविधान दिन | ३४ |
| ३० | जागतिक एडस दिन | ३५-३७ |
| ३१ | आव्हान शिबीर गडचिरोली – स्वयंसेवक सहभाग | ३८-४० |
| ३२ | विकसित भारत @२०४७ – लाईव्ह व्याख्यान | ४० |
| ३३ | मतदार दिन प्रतिज्ञा | ४१-४२ |
| ३४ | मतदार साक्षरता मंडळ स्थापना | ४२ |
| ३५ | प्रजासत्ताक दिन – तंबाखू मुक्तीची शपथ | ४३-४४ |
| ३६ | रस्ते सुरक्षा सप्ताह – वाहतूक जागृती कार्यक्रम | ४४ -४५ |
| ३७ | उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार – दि.१० फेब्रुवारी२०२४ | ४६ |
| ३८ | उत्कर्ष निवड चाचणी स्वयंसेवक सहभाग | ४७ |
| ३९ | PFMS प्रशिक्षण कार्यशाळेत कार्यक्रमाधिकारी सहभाग | ४७-४८ |
| ४० | My Bharat पोर्टलवर नोंदणी | ४८-४९ |
| ४१ | मतदार जनजागृती कार्यक्रम | ४९-५० |

## १. कार्यक्रमाधिकारी प्रशिक्षणात सहभाग:-

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी यांचे दोन दिवसीय प्रशिक्षण दिनांक २६ व २७ मे २०२३ रोजी सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथे घेण्यात आले. या अधिवेशनासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रामकिशन लोमटे यांनी सहभाग घेतला. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये करावयाच्या उपक्रमाविषयी या अधिवेशनात/प्रशिक्षणात माहिती देण्यात आली.




कार्यक्रमाधिकारी प्रशिक्षणात सहभाग-प्रा. डॉ. रामकिशन लोमटे



कार्यक्रमाधिकारी प्रशिक्षणात सहभाग - प्रा. डॉ. रामकिशन लोमटे

## २. जागतिक पर्यावरण दिन:-

राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक ५ जुन २०२३ रोजी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने फुलंब्री जवळच्या धरणातील प्लास्टिक कचरा संकलित करून धरण स्वच्छ करण्यात आले. यावेळी ४७ स्वयंसेवक, महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांनी श्रमदानात सहभाग घेतला.




धरणातील प्लास्टिक कचरा संकलन करताना स्वयंसेवक




धरणातील प्लास्टिक कचरा संकलन

## ३. जागतिक योग दिन:

दिनांक २१ जून २०२३ रोजी जागतिक योग दिन निमित्ताने महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग, क्रीडा विभाग व श्री संत सावता गुरुकुल यांनी संयुक्तरित्या योग प्राणायाम शिबीर घेतले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,कर्मचारी व विद्यार्थी असे ५८ तसेच गुरुकुलातील विद्यार्थी व शिक्षक ४५० असे एकूण ५०८ जन उपस्थित होते. योग प्रशिक्षक श्रीमती वंदना हिवराळे यांनी यावेळी योग- प्राणायामाची प्रत्याक्षिके करून दाखविली.




योग प्रशिक्षक श्रीमती वंदना हिवराळे योग - प्राणायाम शिकविताना



**योग - प्राणायाम शिबीर**

### ४. महाराष्ट्र कृषी दिन:

दिनांक १ जुलै २०२३ रोजी महाराष्ट्र कृषी दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात वृक्षरोपण करण्यात आले. यावेळी १० वृक्ष लावण्यात आले. या प्रसंगी प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी २५ जन सहभागी झाले.




वृक्षरोपण कार्यक्रम



वृक्षरोपण करताना डॉ. पांडुरंग कल्याणकर

### ५. जागतिक लोकसंख्या दिन:

दिनांक ११ जुलै २०२३ रोजी महाविद्यालयात जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने श्री बाबासाहेब लहाने यांचे ‘वाढती लोकसंख्या आणि आव्हाने’ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.




**व्याख्यान देताना - श्री बाबासाहेब लहाने**

### ६. राष्ट्रीय सेवा योजन सल्लागार समिती बैठक:

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक दिनांक २६ जुलै २०२३ रोजी संपन्न झाली. या बैठकीत आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम महाविद्यालयात घेण्याचे ठरले. तसेच सल्लागार समितीचा विस्तार करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ व २०२४-२५ पर्यंत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समिती पुढील प्रमाणे राहील.

१. प्राचार्य डॉ. सुभाष टकले – प्राचार्य - अध्यक्ष
२. डॉ. रामकिशन लोमटे - कार्यक्रमाधिकारी - समन्वयक १
३. डॉ. राजश्री पवार – कार्यक्रमाधिकारी - समन्वयक २
४. डॉ. संजीवकुमार पांचाळ -प्राध्यापक मराठी - सदस्य
५. डॉ. संदीप जगताप – क्रीडा संचालक - सदस्य
६. श्री. सुहास दुतोंडे - माजी विद्यार्थी - सदस्य
७. श्री. चंद्रमणी बनसोडे - राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी प्रतिनिधी - सदस्य

## ७. आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी:

दिनांक १ ऑगस्ट २०२३ रोजी आण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीच्या निमित्ताने सकाळी ११:३० वाजता व्याख्यान आयोजित केले. प्रमुख वक्ते श्री योगेश सोनवणे, प्रकल्प अधिकारी, समाजकल्याण विभाग औरंगाबाद यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या कार्याविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला या कार्यक्रमास विद्यार्थी , प्राध्यापक व कर्मचारी हे उपस्थित होते.




**वक्ते श्री योगेश सोनवणे उपस्थितांना मार्गदर्शन करताना**



महाराष्ट्र टाइम्स

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अण्णा भाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीचे आयोजन करण्यात आले.

# थोर महापुरुषांचा लढा विचारांचा असतो

**योगेश सोनवणे यांचे मत**

**म. टा. प्रतिनिधी**, फुलंब्री

येथील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथीचे आयोजन करण्यात आले. या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून समाज कल्याण विभागाचे प्रकल्प अधिकारी योगेश सोनवणे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले उपस्थित होते.

या वेळी सोनवणे म्हणाले, 'संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आणि लोकमान्य टिळक या थोर पुरुषांकडूनच मानवतेची खरी शिकवण मिळते. संबंध आयुष्यात थोर पुरुषांनी मानवकल्याणाचा लढा लढला आहे. शोषितांच्या कल्याणासाठी आणि रक्षणासाठी आपण लढले पाहिजे, हा विचार तेवत ठेवणारे थोर महापुरुषच असतात. अण्णा भाऊ असोत की लोकमान्य टिळक असोत यांनी समाजासाठी दिलेले योगदान विसरता येण्यासारखे नाही. अण्णा भाऊंचे साहित्य हे माणूसपण नाकारणाऱ्या व्यवस्थेविरुद्ध चीड पेरणारे होते. तर परकीयांच्या अन्यायाविरुद्ध विचारांची चळवळ निर्माण करणारे लेखन लोकमान्य टिळकांचे होते हे नाकारता येत नाही.'

अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केला. प्राजक्ता इंगळे हिने आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गायत्री दुतोंडे हिने केले. कार्यक्रमासाठी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. मंजुषा नळगीरकर व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी, डॉ. रामकिशन लोमटे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## ८. आपत्ती पूर्व प्रशिक्षण कार्यशाळा:

दिनांक ३ ऑगस्ट २०२३ रोजी श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद व श्री संत सावता गुरुकुल माध्यमिक विभाग  यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी शासकीय अधिकारी कविता गायकवाड (उपजिल्हाधिकारी), श्री कृष्णा कानगुले (तहसिलदार फुलंब्री), रुपाली मोगरेकर (अप्पर तहसीलदार फुलंब्री), संजीव राऊत (नायब तहसीलदार फुलंब्री), श्री मारुती म्हस्के (जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी  छत्रपती संभाजीनगर), डॉ. मेघना सोलापुरे (प्रशिक्षक आपत्ती  व्यवस्थापन), श्री. एस. डी. महाजन (मंडळ अधिकारी),  श्री संत सावता गुरुकुलाच्या मुख्याधीपिका सौ. उरणकर, श्री संत सावता गुरुकुलाच्या प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री अप्पासाहेब चव्हाण, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. रामकिशन लोमटे व डॉ. राजश्री पवार यांच्यासह  महाविद्यालयातील व गुरुकुलातील १५५ विद्यार्थी उपस्थित होते.




**आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम**





**आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण**



## आपत्ती व्यवस्थापन शिबिराचे आयोजन

**फुलंब्री :** आपत्ती निवारण करण्याचे कौशल्य प्रत्येक व्यक्तीकडे असणे काळाची गरज आहे. या दृष्टीकोनातून शासन स्तरावरून आपत्तीपूर्व व्यवस्थापन प्रशिक्षण दिल जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून फुलंब्री येथे विद्यार्थी व शिक्षक यांच्यासाठी आपत्ती व्यवस्थापन शिबिर घेण्यात आले.

महसूल विभाग तहसील कार्यालय, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद, यांच्या वतीने श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री व श्री संत सावता गुरुकुल फुलंब्री येथे आपत्ती व्यवस्थापन शिबिर आयोजित करण्यात आले. उपजिल्हाधिकारी कविता गायकवाड, तहसीलदार कृष्णा कानघुले, अप्पर तहसिलदार रूपाली मोगरेकर, नायब तहसिलदार संजीव राऊत, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मारुती म्हस्के, प्रशिक्षक डॉ. मेघा सोलापूरे, एस. डी. महाजन, गुरुकुलाच्या मुख्याध्यापिका श्रीमती उरणकर, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अप्पासाहेब चव्हाण, महाविद्यालयातील क्रिडा संचालक डॉ. संदीप जगताप, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे, डॉ. राजश्री पवार यांच्यासह महाविद्यालयातील आणि गुरुकुलातील विद्यार्थी, शिक्षक असे एकूण १७५ जण या शिबिरात उपस्थित होते.



आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम

## ९. स्वसंरक्षण प्रशिक्षण:

दिनांक ८ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयातील क्रीडा संचालक डॉ. संदीप जगताप यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना स्वसंरक्षण प्रशिक्षण दिले.



स्वसंरक्षण प्रशिक्षण देताना डॉ. संदीप जगताप




स्वसंरक्षण प्रशिक्षणासाठी उपस्थित स्वयंसेवक

## १०. क्रांती दिन:

दिनांक ९ ऑगस्ट २०२३ क्रांती दिन निमित्ताने स्वातंत्र्य आंदोलनातील क्रांतिकारक व राष्ट्रीय नेते यांचा जीवन परिचय व विचार विद्यार्थ्यांना माहिती व्हावेत यासाठी चित्र प्रदर्शन लावण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख प्रा. विजय पांडे यांनी क्रांती दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी चित्रप्रदर्शन पहिले.



क्रांती दिनाविषयी महत्त्व सांगताना प्रा. विजय पांडे




चित्रप्रदर्शन

## ११. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव :-

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्ताने ‘मेरी माटी मेरा देश’ उपक्रम अंतर्गत दि.13, १४, व १५ ऑगस्ट २०२३ हे तीन दिवस ध्वजारोहण करण्याचे व माती हातात घेऊन सेल्फी काढण्याचे आदेश

शासनाने दिलेले होते. त्यानुसार तीन दिवस महाविद्यालयात ध्वजारोहन करून राष्ट्रगीत घेण्यात आले. सेल्फी, पंचप्राण शपथ व विरोंको नमन हे उपक्रम घेण्यात आले.






'मेरी माटी मेरा देश'

## १२. 'हर घर तिरंगा' प्रसिद्धी अभियान:-

दि. १३ ते १५ ऑगस्ट २०२३ हे तीन दिवस 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्याच्या सूचना शासकीय स्तरावरून देण्यात आलेल्या होत्या. त्याअंतर्गत सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी आपल्या घरावर ध्वज फडकवावा अशी सूचना देवून या उपक्रमाचे प्रसिद्धी अभियान राबविण्यात आले.




'हर घर तिरंगा' अभियानात महाविद्यालयातील प्राध्यापकांचा सहभाग

**१३. ध्वजारोहण व पंचप्रण शपथ: -**

दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयात ध्वजारोहण केल्यानंतर पंचप्रण शपथ देण्याची सूचना शासकीय स्तरावरून देण्यात आलेली होती. त्यानुसार पंचप्रण शपथ देण्यात आली.

**पंचप्रण शपथ**

"मी अशी शपथ घेतो की,

१) भारतास २०४७ पर्यंत आत्मनिर्भर आणि विकसीत राष्ट्र बनविण्याचे स्वप्न साकार करू.
२) गुलामीची मानसिकता मुळापासून नष्ट करू.
३) देशाच्या समृद्ध वारशाचा गौरव करू.
४) भारताची एकात्मता बलशाली करू आणि देशाचे संरक्षण करणाऱ्याप्रती सन्मान बाळगू.
५) देशाचे नागरिक म्हणून सर्व कर्तव्याचे पालन करू."



**१४. श्रमदान:**

भारतीय स्वातंत्र्य दिनाची पूर्व तयारी म्हणून राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयात श्रमदान करून परिसर स्वच्छ करण्यात. त्यानंतर स्वयंसेवकांना अल्पोपहार देण्यात आला.




**स्वच्छतेसाठी श्रमदान करताना स्वयंसेवक**



**श्रमदान करताना स्वयंसेवक**

## १५. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक नोंदणी व मार्गदर्शन:-

दिनांक १४ ऑगस्ट २०२३ रोजी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ‘विद्यार्थी संवाद कार्यशाळा’ घेण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना विषयी माहिती देण्यात आली. याबरोबरच स्वयंसेवक नोंदणी फॉर्म व राष्ट्रीय सेवा योजनेचे माहिती पत्रक वाटप करण्यात आले.




विद्यार्थी संवाद कार्यशाळा’-  राष्ट्रीय सेवा योजनेची माहिती देण्यात आली.




विद्यार्थी संवाद कार्यशाळा’- विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेची माहिती देण्यात आली.




राष्ट्रीय सेवा योजनेत नाव नोंदविलेले विद्यार्थी



Original

RECEIPT

**DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY, AURANGABAD.**

Received From:PRINCIPAL SHRI SANT SAVTA MALI GRAMIN COLLEGE PHULAMBRI A:BAD

Receipt No.: 28994

Main Head: RECEIPT - MISCELLANEOUS RECEIPTS

Date:01-Sep-2023

| Particulars | Amount (Rs.) |
|---|---|
| 1- N S S REGISTRATION FEES | 1500.00 |
| In Words Rupees One Thousand Five Hundred And Zero Rs. Only. As per UPI Tran No.:3779957 TOTAL | 1500.00 |

हे ज्ञानिची पवित्रता । ज्ञानीचि आथि ॥

Sr. No. : S 60931 GKA Stamp For Supdt. (Cash)

**Note :** Receipt valid subject to realisation of cheque. Original Receipt must be produced while claiming the refund if any.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या १५० स्वयंसेवकांचे नोंदणी शुल्क विद्यापीठाला सादर केले.

## १६. स्वातंत्र्य दिन ध्वजारोहण व विरोंको नमन :-

भरतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने व 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात माजी सैनिक श्री राजेंद्र सांडू बावस्कर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला.



माजी सैनिक श्री राजेंद्र सांडू बावस्कर यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. सुभाष टकले

## १७. मतदार नोंदणी मार्गदर्शन शिबीर:-

दिनांक १८ ऑगस्ट २०२३ रोजी श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री व तहसील कार्यालय फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार नाव नोंदणी विषयी मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. लोकशाहीत मतदान करणे हा नागरिकांचा हक्क आहे. मतदान करण्यासाठी मतदान यादीत नाव असणे आवश्यक आहे. वयाची १८ वर्षे पूर्ण केलेल्या कोणत्याही भारतीय नागरिकास मतदानात नाव नोंदविता येते. मतदार नाव नोंदणी करण्याची पद्धती यावेळी समजून सांगण्यात आली.



Voters Helpline App वर नवीन मतदार नाव नोंदणी करता येते, याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. या शिबिरात नायब तहसीलदार श्री.राऊत साहेब, मास्टर ट्रेनर श्री. दीपक रणदिवे, श्री एन. बी. दुधे, कारकून शेख एस. एस.,ऑपरेटर श्री. संदीप गोरे यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रमाधिकारी डॉ.रामकिशन लोमटे व डॉ. राजश्री पवार यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.




मतदार नोंदणी मार्गदर्शन शिबीर



मतदार नोंदणी मार्गदर्शन शिबीर

## १८. सद्भावना दिवस शपथ:-

भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांचा जन्म दि. २० ऑगस्ट हा भारतात सद्भावना दिवस म्हणून साजरा केला जातो. दि.२० ऑगस्ट २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सद्भावना शपथ देण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील प्रा. विजय पांडे, डॉ.सुरेश मुंढे, डॉ. महेश थोरात, डॉ संदीप जगताप, डॉ. मंजुषा नळगीरकर, डॉ. दिनेश काचकुरे तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे ३७ स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे यांनी केले.



सद्भावना दिवस – शपथ घेताना प्राध्यापक व स्वयंसेवक

## १९. विद्यापीठ वर्धापन दिन:–

दि.२३ ऑगस्ट २०२३ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापन दिन असल्यामुळे महाविद्यालयात सकाळी ८:०० वाजता विद्यापीठाचा ध्वज फडकावण्यात आला. या बरोबरच विद्यापीठ गीताचे सामूहिकरीत्या गायन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.




ध्वजारोहण कार्यक्रम

**२०. रक्षाबंधन: -**

दि.३० ऑगस्ट २०२३ राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लहूजी साळवे बाल संस्कार केंद्र, बाजार गल्ली फुलंब्री येथे रक्षाबंधन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी स्वयंसेविकांनी वस्तीतील 40 बालकांना राख्या बांधल्या. यावेळी महाविद्यालयातील १२ स्वयंसेविका व सहाय्यक कार्यक्रमाधिकारी डॉ राजश्री पवार सहभागी झाल्या होत्या. कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे यांनी केले.




रक्षाबंधन कार्यक्रम

**२१. शिक्षक दिन – स्वयंशासन दिन:-**

दिनांक ५ सप्टेंबर हा दिवस भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक ५ सप्टेंबर २०२३ हा शिक्षक दिन विद्यार्थ्यांनी स्वयंशासन दिन म्हणून साजरा केला. शिक्षकांची भूमिका विद्यार्थ्यांनी केली. अध्यापनात १० विद्यार्थीनी सहभागी झाल्या. उत्कृष्ट अध्यापनात कु. कल्याणी नाईक हिचा प्रथम व कु. आरती केजभट हिचा द्वितीय क्रमांक आला. शिक्षक दिन कार्यक्रमात १०७ विद्यार्थी सहभागी झाले.




शिक्षक दिन निमित्ताने अध्यापन करताना विद्यार्थिनी




शिक्षक दिन निमित्ताने अध्यापन करताना विद्यार्थिनी



महाराष्ट्र टाइम्स

# 'शिक्षक समाजिक भान निर्माण करतात'

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त प्रा. टकले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**फुलंब्री :** 'सामाजिक भान निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे शिक्षक होय,' प्रतिपादन श्री संत सावता माळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी केले.

फुलंब्रीतील श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन स्वयंशासन दिन म्हणून साजरा करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर.टकले उपस्थित राहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. रामकिसन लोमटे यांनी केले.

या वेळी अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षकाच्या भूमिकेतून अध्यापनाचे उत्कृष्ट काम केले. त्यात आरती केजभट, गायत्री दुतोंडे, कल्याणी नाईक, आरती वाघ, पायल तावरे आणि निकिता शिहिरे या विद्यार्थिनींनी वनस्पतीशास्त्र हा विषय विद्यार्थ्यांना शिकविला. उपस्थित विद्यार्थ्यांना प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले यांनी मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन पायल तावरे या विद्यार्थिनीने केले. आभार प्रा. डॉ. राजश्री पवार यांनी मानले. यात प्रथम-क्रमांक कल्याणी नाईक, द्वितीय क्रमांक आरती केजभट यांनी क्रमांक पटकावले. या वेळी डॉ. रामकिसन लोमटे, डॉ. राजश्री पवार, डॉ. मंजुषा नळगीरकर, डॉ. संजीवकुमार पांचाळ, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. महेश थोरात, प्रा. डॉ. नितीन माळेगावकर, डॉ. संदीप जगताप, प्रा. चंद्रनारायण वाघमारे, प्रा. डॉ. विजय खरात, प्रा. उज्ज्वला साबणे, प्रा. जया राजपूत, प्रा. परदेशी, प्रा. भरत कुबेर, प्रा. अक्षय शिंदे उपस्थित होते.

**२४. मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन: -**

दि.१७ सप्टेंबर २०२३ मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन निमित्ताने सकाळी ८:०० वाजता ध्वजारोहन करण्यात आले. त्यानंतर प्रा. डॉ. दिनेश काचकुरे यांचे व्याख्यान आयोजित केले. त्यांनी मराठवाडा मुक्तीसंग्राम विषयी मार्गदर्शन केले.



ध्वजारोहन प्रसंगी उपस्थित प्राध्यापक व कर्मचारी



प्रा. डॉ. दिनेश काचकुरे व्याख्यान देताना

**२५. 'अमृत कलश – माती संकलन':-**

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सव समारोप वर्ष निमिताने 'मेरी माटी मेरा देश' या उपक्रमांतर्गत प्रत्येक गावातील माती संकलित करण्याच्या सूचना भारत सरकारने दिलेल्या होत्या. त्यानुसार माती संकलित करण्यात आली. तसेच ही माती महाविद्यालयातील अमृत वाटिकेसाठी वापरण्यात आली. मा.हरिभाऊ बागडे नाना यांच्या हस्ते दि.२० सप्टेंबर २०२३ रोजी अमृत कलशात माती संकलित करण्याची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे सचिव मा. श्री निवृत्ती गावंडे, श्री सांडू

पाटील जाधव, श्री बाळासाहेब तांदळे, श्री दयानंद कांबळे कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे उपस्थित होते.




अमृत कलशात माती टाकताना मा.हरिभाऊ बागडे नाना




अमृत कलशात माती टाकताना मा.देवजीभाई पटेल, डॉ. प्रदीप जबदे सर, उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी

## २४. राष्ट्रीय सेवा योजना दिन: -

दिनांक २४ सप्टेंबर २०२३ या दिवसी राष्ट्रीय सेवा योजना दिन निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. नितीन मालेगावकर यांचे 'राष्ट्रीय सेवा योजना-ओळख' या विषयी व्याख्यान आयोजित करण्यात आले. व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे व डॉ. राजश्री पवार हे उपस्थित होते.




व्याख्यान देताना प्रा. डॉ. नितीन मालेगावकर

## २५. राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड शिबीर सोलापूर- एक स्वयंसेविका सहभागी:-

राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलनासाठी डॉ. बा.आं.म.विद्यापीठ स्तरावर निवड प्रक्रिया पूर्ण होऊन महाराष्ट्र राज्यस्तरीय निवड शिबीर सोलापूर येथे झाले. त्यात महाविद्यालयाची कु.आरती केजभट ही स्वयंसेविका सहभागी झाली.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात झालेल्या निवड चाचणीत तिची निवड झाली. विद्यापीठाच्या वतीने राज्यस्तरीय निवड शिबीरात ती सहभागी झाली. विजयवाडा येथे होणाऱ्या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन साठी तिची राखीव म्हणून निवड झाली होती.




**महाराष्ट्र राज्यस्तरीय निवड शिबीर सोलापूर**




**महाराष्ट्र राज्यस्तरीय निवड शिबीर सोलापूर**



राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड शिबीर, सोलापूर (महाराष्ट्र)

• प्रमाणपत्र •

श्री./श्रीमती. केजभट आरती गवनाजी
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

यास / हिस दि. २७ ते २९ सप्टेंबर, २०२३ या कालावधीत रासेयो क्षेत्रीय कार्यालय, पुणे युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई व राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचलन राज्यस्तरीय निवड शिबीरात सक्रीय सहभाग घेतल्याबाबत हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

National Pre-Republic Day Parade State Level Selection Camp, Solapur (Maharashtra)

• Certificate •

*This is certify that*

*Mr./Miss* Kejbhat Arti Gavanaji
Shri Sant Savta Mali Gramin Mahavidyalaya

*has activity participated in National Pre-Republic Day Parade State Level Selection Camp, Organized by the NSS Regional Centre Pune, Ministry of Youth Affairs and Sports, Government of India and Department of Higher & Technical Education, Govt. of Maharashtra, Mumbai in Collaboration with NSS Cell, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur during 27 to 29 September 2023.*

Prof. Dr. Rajendra Wadje
NSS Programme Co-ordinator
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

Shri. Ajay Shinde
Regional Director
Maharashtra and Goa
Government of India

Dr. Rameshwar Kothawale
State Liaison Officer
NSS Cell
Government of Maharashtra

Prof. Dr. Rajnish Kamat
Vice Chancellor
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

महाराष्ट्र राज्यस्तरीय शिबीर सोलापूर येथील कु.आरती केजभट हिचे प्रमाणपत्र

## २६. गांधी साप्ताह श्रमदान- दि.१ ऑक्टोबर २०२३:-




श्रमदान- सहभागी विद्यार्थी



श्रमदान- सहभागी विद्यार्थी



MINISTRY OF HOUSING AND URBAN AFFAIRS
GOVERNMENT OF INDIA

Swachhata Hi Seva

# Certificate of Appreciation

This is to certify that

**Ramkishan Lomte**

Has contributed in
Shramdaan for Swachh Bharat
On
1st October, 2023, at 10 AM

**A Swachh Bharat Mission Initiative**

श्रमदान- सहभाग प्रमाणपत्र

**२७. महात्मा गांधी व लालबहाद्दूरशास्त्री जयंती: -**

दि. २ ऑक्टोबर २०२३ रोजी महात्मा गांधी व लालबहाद्दूरशास्त्री जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ.सुभाष टकले यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर स्वयंसेवक व प्राध्यापक, कर्मचारी यांनी अभिवादन केले.



महात्मा गांधी व लालबहाद्दूरशास्त्री जयंती साजरी करण्यात आली.

**२८. सरदार वल्लभभाई पटेल जयंती व स्व. पंतप्रधान इंदिरा गांधी पुण्यतिथी:-**

दिनांक ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी सरदार वल्लभभाई पटेल जयंती व स्व. पंतप्रधान इंदिरा गांधी पुण्यतिथी निमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. हा दिवस 'राष्ट्रीय एकता दिन' म्हणून साजरा केला जातो. 'राष्ट्रीय एकता दिन शपथ' विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांना देण्यात आली.



सरदार वल्लभभाई पटेल जयंती व स्व. पंतप्रधान इंदिरा गांधी पुण्यतिथी



राष्ट्रीय एकता दिन शपथ घेताना विद्यार्थी व प्राध्यापक




वृक्षारोपण- ३१ ऑक्टोबर २०२३ महाविद्यालयात आलेल्या NAAC समिती सदस्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

## २९. संविधान दिन:-

दि.२६ नोव्हेंबर २०२३ रोजी संविधान दिन निमित्ताने उद्देशपत्रिका वाचन करण्यात आले. भारतीय संविधानाविषयी विद्यार्थ्यांना माहिती असली पाहिजे या दृष्टीकोनातून Google Quiz तयार करण्यात आली. संविधानाविषयी प्रश्न विचरण्यात आले. प्रत्येक प्रश्नाला चार पर्याय देण्यात आले. विद्यार्थ्यांना whatsapp Group वर Quiz ची लिंक पाठविण्यात आली व विद्यार्थ्याकडून भरून घेतली.



उद्देशपत्रिका वाचन करताना विद्यार्थी




**संविधानाविषयी Google Quiz**

## ३०. जागतिक एडस दिन व्याख्यान :-

**व्याख्यान**- जागतिक एडस दिनाच्या निमित्ताने जनजागृतीसाठी दिनांक १ डिसेंबर २०२३ रोजी डॉ. संदीप जगताप यांचे व्याख्यान आयोजित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना एडस होण्याची करणे व परिणाम सांगितले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे व डॉ. राजश्री पवार हे उपस्थित होते.

**एडस विषयी माहिती पत्रके वाटप**-जागतिक एडस दिन दिनांक १ डिसेंबर २०२३ रोजी साजरा करीत असताना विद्यार्थ्यांना एडस या आजाराची लागण होण्याची करणे व त्याचे होणारे परिणाम या विषयी माहिती देणारी पत्रके वाटप करण्यात आले.

**रेड रिबीन क्लबची स्थापना -** दिनांक १ डिसेंबर २०२३ रोजी जागतिक एडस दिन निमित्ताने एडस विषयी जागृती करण्यासाठी महाविद्यालयात 'रेड रिबीन क्लब' ची स्थापना करण्यात आली.




जागतिक एडस दिन व्याख्यान देताना डॉ. संदीप जगताप




जागतिक एडस दिन व्याख्यान - उपस्थित स्वयंसेवक



जागतिक एडस दिन व्याख्यान - उपस्थित स्वयंसेवक



विद्यार्थ्यांना एडस विषयी माहिती पत्रके वाटप करण्यात आले




रेड रिबीन क्लबची स्थापना

### ३१. आव्हान शिबरात तीन स्वयंसेवकांचा सहभाग:-

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे होणाऱ्या (दिनांक २३ डिसेंबर २०२३ ते ३ जानेवारी २०२४) राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागात दिनांक ७ डिसेंबर २०२३ रोजी स्वयंसेवक निवड चाचणी घेण्यात आली. त्यात महाविद्यालयाचे कु. साक्षी गायकवाड, सौ. मंजुषा पेरकर, श्री विशाल पेहेरकर व श्री विजय पेहेरकर हे चार स्वयंसेवक सहभागी झाले. त्यापैकी कु. साक्षी गायकवाड, सौ. मंजुषा पेरकर, व श्री विजय पेहेरकर या तीन स्वयंसेवकांची निवड झाली.

गडचिरोली येथे दिनांक २५ डिसेंबर ते ३ जानेवारी २०२४ या कालावधीत महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी आयोजित केलेल्या आव्हान या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरात कु. साक्षी गायकवाड, सौ. मंजुषा पेरकर, व श्री विजय पेहेरकर हे तीन स्वयंसेवक सहभागी झाले. दिनांक २३ डिसेंबर २०२३ रोजी महाविद्यालयातून विद्यार्थी शिबिरासाठी सहभागी झाले. शिबीर यशस्वीरित्या पूर्ण करून दिनांक ५ जानेवारी २०२४ रोजी परतले.




आव्हान- निवड चाचणीत स्वयंसेवक सहभाग



गडचिरोली - आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात सहभागी स्वयंसेवक





गडचिरोली - आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात सहभागी स्वयंसेवक







गडचिरोली - आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिरात सहभागी स्वयंसेवक

### ३२. विकसित भारत @२०४७ - लाईव्ह व्याख्यान:

दिनांक ११ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १०:०० वाजता माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसित भारत @२०४७ - लाईव्ह व्याख्यानास महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.



माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसित भारत @२०४७ - लाईव्ह व्याख्यान

## ३३. मतदार दिन प्रतिज्ञा :-

दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी भारतीय मतदार दिन निमित्ताने महाविद्यालयात प्रतिज्ञा घेतली.

शासन परिपत्रक क्रमांकः **संकीर्ण-२०२१/प्र.क्र. १५३/विशि-३**

---

**परिशिष्ट २**
**राष्ट्रीय मतदार दिवस**
**मतदारांसाठी प्रतिज्ञा**

**मराठी**

**"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे, प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परपरांचे जतन करु आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करु."**




मतदार दिन प्रतिज्ञा - प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी



मतदार दिन प्रतिज्ञा - प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी

**३४. मतदार साक्षरता मंडळ स्थापना (Electoral literacy club):-**

मतदारांना मतदानाचे महत्त्व सांगून मतदान वाढवण्यासाठी जनजागृती घडवून आणण्यासाठी महाविद्यालयात मतदान साक्षरता मंडळ स्थापन करण्यात आले. मंडळाचे नोडल अधिकारी म्हणून प्रा.डॉ. राजश्री पवार यांची नेमणूक केली असून कु.आरती केजभट (बी.एस्सी.तृतीय वर्ष), कु. ऋतुजा अंभोरे(बी.कॉम.द्वितीय वर्ष), श्री विजय पेहेरकर(बी.एस्सी.तृतीय वर्ष) व श्री समाधान दांगोडे (बी.ए.प्रथम वर्ष) हे विद्यार्थी सदस्य आहेत.

**३५. गणराज्य दिन:-**

**दिनांक२६ जानेवारी २०२४ रोजी गणराज्य दिन निमित्ताने महाविद्यालयात ध्वजारोहण केल्यानंतर विद्यार्थी, प्राध्यापक . कर्मचारी यांना तंबाखू मुक्तीची शपथ देण्यात आली.**

## राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम

भारत सरकारचा तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा २००३ तसेच E-cigarette बंदीबाबतचा दि. १८/०९/२०१९ चा अध्यादेश यांची प्रभावी अंमलबजावणी होनेकारिता आज दि."२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त" तंबाखू मुक्तीची शपथ घेत आहोत-

**"शपथ"**

तंबाखू, जर्दा, खर्रा तसेच
बिडी, सिगारेट, ई - हुक्का, ई - सिगारेट
यांच्या दुष्परीणामांची मला जाणीव आहे.
म्हणून मी जन्मभर, या व्यसनांपासून.
दूर राहण्याचा संकल्प करीत आहे.
माझे कार्यालय, माझे घर, आणि
माझा परिसर तंबाखूमुक्त रहावा,
तसेच इतरांनी तंबाखूजन्य पदार्थांचा परित्याग करावा,
यासाठी मी प्रयत्न करेन.
भारत सरकारच्या, २००३ च्या तंबाखू नियंत्रण कायद्याची
प्रभावी अंमलबजावणी व्हावी
यासाठी मी सतत प्रयत्नशील राहीन.
माझ्या अधिपत्याखालील व जिल्ह्यातील
सर्व आरोग्य संस्था, शाळा व शासकीय कार्यालये
तंबाखूमुक्त तसेच ई - सिगारेटमुक्त करेन.
मी, माझे कार्यालय, माझे घर, माझे गाव,
माझी शाळा, माझी संस्था आणि, माझा महाराष्ट्र
तंबाखु मुक्त करण्याचा प्रयत्न करेन

द्या तंबाखू व ई-सिगारेटला नकार, करा सुदृढ आरोग्याचा स्विकार



**तंबाखू मुक्तीची शपथ कार्यक्रम**



**तंबाखू मुक्तीची शपथ कार्यक्रम**

### ३६. रस्ते सुरक्षा सप्ताह:-

दिनांक ३० जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयात रस्ते सुरक्षा सप्ताह निमित्ताने रस्ते सुरक्षा विषयक व्याख्यान कार्यक्रम घेण्यात आला. मार्गदर्शक श्री मनोज चव्हाण (मोटार वाहन निरीक्षक, परिवहन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर) श्री धनंजय देवकर (मोटार वाहन निरीक्षक, परिवहन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर) श्री दादासिंग धुनावत (सहायक मोटार वाहन निरीक्षक, परिवहन कार्यालय, छत्रपती संभाजीनगर) हे उपस्थित होते. मार्गदर्शन करताना वक्ते म्हणाले वाहन चालवताना वाहतूक विषयक नियमांचे पालन करणे आवश्यक

आहे. यावेळी वाहतूक विषयक नियमांची माहिती दिली. या बरोबरच कार्यक्रमाच्या शेवटी रस्ते सुरक्षा शपथ देण्यात आली. या कार्यक्रमास ६२ स्वयंसेवक उपस्थित होते.



**रस्ते सुरक्षा जागृती व्याख्यान कार्यक्रम**



**रस्ते सुरक्षा शपथ**

### ३७. उत्कृष्ट स्वयंसेवक व स्वयंसेविका पुरस्कार:-

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या वतीने दरवर्षी महाविद्यालयातील स्वयंसेवकांमधून एक उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार व एक उत्कृष्ट स्वयंसेविका पुरस्कार असे दोन पुरस्कार देण्यात येतात. महाविद्यालय स्तरावर चंगले कार्य केल्याबद्दल पुरस्कार दिला जातो. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार बी. एस्सी. तृतीय वर्षाचा विद्यार्थी श्री विजय कैलास पेहेरकर याला व उत्कृष्ट स्वयंसेविका पुरस्कार बी. एस्सी. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. आरती केजभट हिला देण्यात आला. हे पुरस्कार वार्षिक स्नेह सम्मेलनात दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी संस्थेचे उपाध्यक्ष मा.देवजीभाई पटेल, कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. कैलाश इंगळे यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले.


डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नित व
पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचलित
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
ता.फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर
राष्ट्रीय सेवा योजना
"उत्कृष्ठ स्वयंसेविका पुरस्कार"
२०२३-२०२४
प्रमाणित करण्यात येते की,
कु. आरती गवनाजी केजभट
हिने महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत राष्ट्रीय सेवा योजनेच्या
विविध कार्यक्रमामध्ये तसेच विशेष शिबीरामध्ये भाग घेऊन उल्लेखनीय कामगिरी करत
महाविद्यालयाचे नाव लौकीक केले आहे. त्या करीता महाविद्यालयाच्या
राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाकडून देण्यात येणारा सन २०२३-२०२४ चा
'उत्कृष्ठ स्वयंसेविका पुरस्कार'
प्रदान करण्यात येत आहे.
कार्यक्रमाधिकारी सहकार्यक्रमाधिकारी प्राचार्य





डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नित व
पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचलित
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री
ता.फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर
राष्ट्रीय सेवा योजना
"उत्कृष्ठ स्वयंसेवक पुरस्कार"
२०२३-२०२४
प्रमाणित करण्यात येते की,
श्री. विजय कैलास पेहेरकर
याने महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करत राष्ट्रीय सेवा योजनेच्या
विविध कार्यक्रमामध्ये तसेच विशेष शिबीरामध्ये भाग घेऊन उल्लेखनीय कामगिरी करत
महाविद्यालयाचे नाव लौकीक केले आहे. त्या करीता महाविद्यालयाच्या
राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाकडून देण्यात येणारा सन २०२३-२०२४ चा
'उत्कृष्ठ स्वयंसेवक पुरस्कार'
प्रदान करण्यात येत आहे.
कार्यक्रमाधिकारी सहकार्यक्रमाधिकारी प्राचार्य




**उत्कृष्ट स्वयंसेवक व उत्कृष्ट स्वयंसेविका पुरस्कार प्रदान समारंभ**

### ३८. उत्कर्ष निवड चाचणीत स्वयंसेवक सहभाग:

राज्यस्तरीय सांस्कृतिक स्पर्धा (उत्कर्ष) साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा संघ पाठविण्यासाठी निवड चाचणी दिनांक २ मार्च २०२४ रोजी विद्यापीठात घेण्यात आली. यात महाविद्यालयातील स्वयंसेविक कु. आश्विनी नाईक(नृत्य) व स्वयंसेवक श्री आदित्य वाघ (कविता वाचन व निबंध) यासाठी सहभाग घेतला.



**विद्यापीठ निवड चाचणीत सहभाग कु. आश्विनी नाईक व आदित्य वाघ**

### ३९. PFMS कार्यशाळेत कार्यक्रमाधिकारी सहभाग: -

राष्ट्रीय सेवा योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने PFMS बाबत आयोजित केलेल्या कार्यशाळेत कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे सहभागी झाले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर संलग्नित
देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर
राष्ट्रीय सेवा योजना
रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी PFMS प्रशिक्षण कार्यशाळा
गुरुवार, दि. १४-०३-२०२४, सकाळी ११:३० ते २:००

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की श्री/ श्रीमती प्रा. डॉ. रामकिशन वसंतराव लोमटे हे देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १४-०३-२०२४ रोजी जिल्हास्तरीय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रशिक्षण कार्यशाळेस उपस्थित राहून सक्रिय सहभाग नोंदवला. करीत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

श्री. ज्ञानेश्वर पाथ्रीकर
जिल्हा समन्वयक
रा. से. यो. छ. संभाजीनगर


डॉ. सोनाली क्षीरसागर
संचालक
रा. से. यो. डॉ. बा.आं. म. वि. छ. संभाजीनगर

डॉ. अशोक तेजनकर
प्राचार्य,
देवगिरी महाविद्यालय , छ. संभाजीनगर


कार्यशाळेत उपस्थित प्रमाणपत्र

## ४०. MY BHARAT Portal वर नोंदणी : -

MY BHARAT Portal वर verifier म्हणून कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे यांची नोंदणी केली असून महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची YOUTH म्हणून नोंदणी केलेली आहे.




| S.NO. | YOUTH NAME | YOUTH TYPE | ACTION | STATUS |
|---|---|---|---|---|
| 1 | Abhishek somnath zarkar | NSS | View Profile / Reject as NSS | APPROVED |
| 2 | Anil kaduba bithere | NSS | View Profile / Reject as NSS | APPROVED |
| 3 | Dattatrya Dinesh Toranmal | NSS | View Profile / Reject as NSS | APPROVED |



Yuva List | MYBharat

mybharat.gov.in/pages/nsscoord/1

Welcome Ramkishan

| S.NO. | YOUTH NAME | YOUTH TYPE | ACTION | STATUS |
|---|---|---|---|---|
| 1 | Abhishek somnath zarkar | NSS | View Profile / Reject as NSS | APPROVED |
| 2 | Anil kaduba bithere | NSS | View Profile / Reject as NSS | APPROVED |
| 3 | Dattatrya Dinesh Toranmal | NSS | View Profile / Reject as NSS | APPROVED |
| 4 | Gayatri Ramesh Dutonde | NSS | View Profile / Reject as NSS | APPROVED |
| 5 | Aarti Gavanaji Kejbhat | NSS | View Profile / Reject as NSS | APPROVED |
| | | | View Profile | |

## ४१. मतदान जनजागृती कार्यक्रम:-








श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक १८ एप्रिल २०२४ रोजी महाविद्यालयात मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयात यापूर्वीच दिनक २५ जानेवती २०२४ रोजी मतदार दिनाच्या निमित्ताने निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करण्यात आलेले आहे. लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने हा मतदान जनजागृती कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर हे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. संजीव कुमार पांचाळ, डॉ . संदीप जगताप हे उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाचे आयोजन निवडणूक साक्षरता मंडळाच्या नोडल अधिकारी डॉ. राजश्री पवार व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे यांनी केले. लोकशाहीमध्ये शासन निवडण्याची संधी मतदारांना असते. आपले मत अमुल्य आहे. मतदानाद्वारे आपल्या पसंतीचा लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार नागरिकांना असतो. दिनांक १३ मे २०२४ रोजी होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील लोकसभा निवडणुकीत आपण मतदान करून भारतीय लोकशाही बळकट करण्यासाठी आपले योगदान द्यावे असे मत यावेळी वक्त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रम घेण्यासाठी तहसील कार्यालयातील श्री नेमीनाथ दुधे सर यांचे मार्गदर्शन लाभले.




उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर मतदान जागृती करताना




प्रा.डॉ.संजीवकुमार पांचाळ मतदान जागृती करताना

= o =

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचालित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय

## फुलंब्री

संलग्न - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ

छत्रपती संभाजीनगर

# राष्ट्रीय सेवा योजना

## अहवाल

# विशेष शिबीर

‘युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास’

दि.१७ ते २३ जानेवारी २०२४

## मौजे - गणोरी

ता. फुलंब्री जि.छत्रपती संभाजीनगर

शैक्षणिक वर्ष २०२३-२४

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विवरण | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | उद्घाटन समारंभ | ३-५ |
| २ | बौद्धिक सत्र पहिले | ५-७ |
| ३ | व्याख्यान सत्र पहिले | ७-९ |
| ४ | बौद्धिक सत्र दुसरे | १० |
| ५ | व्याख्यान सत्र दुसरे | ११-१२ |
| ६ | बौद्धिक सत्र तिसरे | १२-१३ |
| ७ | व्याख्यान सत्र तिसरे | १३-१६ |
| ८ | बौद्धिक सत्र चौथे | १६-१७ |
| ९ | व्याख्यान सत्र  चौथे | १७-१८ |
| १० | बौद्धिक सत्र पाचवे | १९-२० |
| ११ | व्याख्यान सत्र पाचवे | २०-२३ |
| १२ | बौद्धिक सत्र सहावे | २३ |
| १३ | व्याख्यान सत्र सहावे | २४ |
| १४ | स्व-संरक्षण विषयी मार्गदर्शन | २४-२६ |
| १५ | शिबिराचा समारोप | २८ |
| १६ | शिबिरातील दैनंदिन उपक्रम – व्यायाम | २८-२९ |
| १७ | शिबिरातील दैनंदिन उपक्रम- ग्रामस्वच्छता | २९-३० |
| १८ | जनजागृती दिंडी | ३०-३१ |
| १९ | प्रतिष्ठित व्यक्तींची शिबिराला भेट | ३२ |
| २० | शिबिरातील दैनंदिन उपक्रम-श्रमदान | ३३ |
| २१ | वृक्ष दिंडी व वृक्षारोपण | ३४ |
| २२ | पथनाट्य | ३५-३६ |
| २३ | सर्वेक्षण | ३७ |

# पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचालित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

**१. उद्घाटन समारंभ :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित व पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचालित, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर दिनांक 17 जानेवारी 2024 ते 23 जानेवारी 2024 या कालावधीत मौजे गणोरी तालुका फुलंब्री जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन दिनांक 17 जानेवारी 2024 रोजी सकाळी १० वाजता झाले. शिबिराचे उद्घाटन राष्ट्रीय सेवा योजनेचे संभाजीनगर जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर, यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव श्री निवृत्ती गावंडे, सरपंच सौ. सरलाताई तांदळे,विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी गणोरीचे व्हा.चेअरमन श्री संतोष पाटील तांदळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे, डॉ. राजश्री पवार उपस्थित होते.




शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी मा.श्री निवृत्ती गावंडे, डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर, सौ. सरलाताई तांदळे,श्री संतोष पाटील तांदळे

शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर म्हणाले राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना श्रम, चारित्र्य आणि स्वावलंबन शिकविते. राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांतील गुणांचा विकास होतो. युवकांनी समाजात जावे, समाजातील समस्या जाणून घेऊन त्या समस्येवर उत्तरे शोधावी. विद्यार्थ्यांना समाजाचे ज्ञान मिळावे हा राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश आहे. राष्ट्रीय सेवा योजनेत जे विद्यार्थी सहभागी होतात, त्यांना व्यसनापासून दूर राहण्याचे शिकविले जाते. विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता व गतिशीलता निर्माण करणे तसेच युवकांना घडविणे हे राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय आहे, असे विचार त्यांनी व्यक्त केले.



शिबिराच्या उद्घाटनपर भाषण करताना डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर

शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी गणोरी गावच्या सरपंच सौ. सरलाताई तांदळे, तसेच विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे व्हा.चेअरमन श्री संतोष पा. तांदळे हे उपस्थित होते. याप्रसंगी सरपंच सौ. सरलाताई तांदळे म्हणाल्या श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मागील वर्षी सुध्दा शिबीर आमच्या गावात झाले होते. हे शिबिराचे दुसरे वर्ष आहे. आम्ही गावाच्या वतीने शिबिराला पूर्ण सहकार्य करीत आहोत. विद्यार्थ्यांना शिबिरातून अनेक गोष्टी शिकायला मिळतात. या संधीचा फायदा विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे,असे मत त्यांनी व्यक्त केले.




शिबिराच्या उद्घाटन समारंभाचा अध्यक्षीय समारोप करताना संसाठेचे सचिव श्री निवृत्ती गावंडे

या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष व संस्थेचे सचिव माननीय श्री निवृत्ती गावंडे अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून गावात श्रमदान, ग्राम स्वच्छता हे उपक्रम राबविले जातात. महाविद्यालयात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षणच दिले जाते असे नव्हे तर राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष गावात जावून अनुभवातून शिक्षण मिळते.

## २. बौद्धिक सत्र पहिले:

दिनांक १७ जानेवारी २०२४ बुधवार रोजी दुपारी ३ ते ४ या वेळेत ‘बौद्धिक सत्रात’ प्रमुख वक्ते म्हणून डॉ.पांडुरंग कल्याणकर व सत्राचे अध्यक्ष डॉ.नितीन मालेगावकर यांनी ‘अन्न सुरक्षा’ या विषयावर विचार मांडले. डॉ. कल्याणकर सर म्हणाले सर्व नागरिकांना सर्वकाळ अन्न मिळणे म्हणजे अन्नसुरक्षा होय. जागतिक विकास अहवालानुसार आरोग्य संपन्न व सक्रिय जीवन जगण्यासाठी सर्वकाळ अन्न मिळणे आवश्यक आहे. जगात हजारो लोक दरवर्षी अण्णा वाचून मरतात, प्रत्येक वर्षी कुपोषणाने 60000 बालकांचा मृत्यू होतो. भारतात एम. एस. स्वामीनाथन यांना हरितक्रांतीचे जनक मानले जाते. ई.स.1960 च्या दशकात त्यांनी हरितक्रांतीसाठी मोलाचे योगदान दिलेले आहे. आतापर्यंत 12 पंचवार्षिक योजना झाल्या. यात अन्नधान्याच्या बाबतीत भारताला स्वयंपूर्ण बनविण्यावर भर दिला गेला. ई.स.1972 मध्ये भारतात सर्वात मोठा दुष्काळ पडला होता. तीन लाख

लोक या दुष्काळात मरण पावले. भारतात सार्वजनिक वितरण व्यवस्था अंतर्गत स्वस्त धान्य उपलब्ध केले जाते. गरीब लोकांसाठी अंत्योदय योजना शासनाने सुरू केलेली आहे. स्वस्त धान्य दुकान च्या माध्यमातून गरिबांना मोफत अथवा कमी किमतीत अन्नधान्य उपलब्ध करून देण्याची व्यवस्था शासनाने केलेली आहे. आपल्या देशात सर्वात जास्त उत्पादन तांदळाचे होते. 2013 मध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा केंद्र सरकारने केला व देशात लागू झाला त्यानुसार प्रत्येक नागरिकाला आवश्यक तेवढे अन्नधान्य पुरवठा करण्याची हमी देण्यात आलेली आहे असे प्रा. डॉ. पांडुरंग कल्याणकर म्हणाले.

या बौद्धिक सत्राचे अध्यक्ष डॉ.नितीन मालेगावकर यांनी समारोप करताना ‘अन्न सुरक्षा’ या विषयावर विचार मांडले. अन्न ही प्रत्येक व्यक्तीची प्रथम गरज असून भारत सरकारने अन्नसुरक्षा वर भर दिलेला आहे. नागरिकांना किमान आवश्यक अन्नधान्य उपलब्ध करून देण्याचे हमी या माध्यमातून देण्यात आलेली आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.




बौद्धिक सत्र - वक्ते डॉ.पांडुरंग कल्याणकर व सत्राचे अध्यक्ष डॉ.नितीन मालेगावकर




बौद्धिक सत्र - वक्ते डॉ.पांडुरंग कल्याणकर व सत्राचे अध्यक्ष डॉ.नितीन मालेगावकर

३. **व्याख्यान सत्र पहिले**:

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसाचे निवासी शिबिर मौजे गणोरी येथे दिनांक १७ जानेवारी २०२४ रोजी प्रारंभ झाले. दिनांक १७ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळच्या व्याख्यान सत्रात ७:३० ते ८:३० या वेळेत समाजप्रबोधन कार्यक्रम ठेवण्यात आला होता. श्री भालचंद्र पुजारी, श्री उत्तमराव वैष्णव, डॉ.नरेंद्र पुजारी, श्री भगवान वाघ, श्री रवींद्र पुजारी, श्री कल्याण कुंटे यांनी 'समाज प्रबोधन कार्यक्रम – भारुड' सदर केला. या कार्यक्रमासाठी गणोरी गावच्या सरपंच सौ सरलाताई तांदळे, महाविद्यालयातील स्वयंसेवक व स्वयंसेविका तसेच गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## गणोरी येथे सावता माळी महाविद्यालयाच्या सेवा योजना शिबिराला प्रारंभ

पाह ता.18 (प्रतिनिधी) फुलंब्री येथील सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या वतीने गणोरी येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा शुभारंभ बुधवारी(ता.17)झाला..फुलंब्री येथील गणेश संच मंडळ यांनी रात्री आठ ते दहा समाज प्रबोधन भारुड कार्यक्रम सादर केला. मुलांचा पोषक आहार तरुण पिढीची व्यसनाधीनता. स्त्रीभ्रूणहत्या.पर्यावरण.वृक्षारोपण.झाडे लावा. झाडे जगवा इत्यादी संदेश भारुडा मधून देण्यात आला.वासुदेव बुरगुंडा आणि वारीक या भारुडाद्वारे वरील संदेश देण्यात आला. धर्म ही अशी वस्तू आहे जिच्यामुळे पशुचे मनुष्यात रूपांतर होते.धर्माचे आचरण करण्यासाठी संस्कृती तिकडे पाहिजे आणि संस्कृतीसाठी कुटुंबातून मुलांना संस्कार मिळाले पाहिजे. संस्कारक्षम पिढी बनवा. समाजातील वाईट चालीरीतीवर ताशेरे ओढण्यासाठी संतांनी भारुडांची रचना केली आणि म्हणूनच ज्ञानरूपी वस्त?याने अज्ञानाची चांगली बारीक हजामत करण्यासाठी संत सेना महाराजांचा वारिक भारुड सादर केले.पाणी आडवा पाणी जिरवा पण आपण एकमेकांना अडवतोय आणि एकमेकांची जिरवतोय हे भारुडातून प्रबोधन केले आपली संस्कृती टिकली पाहिजे हे भारुडातुन पटवून दिले. भारुडकार भालचंद्र पुजारी यांच्यासोबत उत्तम दास वैष्णव.डॉ.नरेंद्र पुजारी. भगवान वाघ.रवींद्र पुजारी. कल्याण कुंटे यांनी सहकार्य केले.




समाजप्रबोधन - व्याख्यान देताना श्री भालचंद्र पुजारी व त्यांचे सहकारी



समाजप्रबोधन श्री भालचंद्र पुजारी व त्यांचे सहकारी




समाजप्रबोधन भारुड सदर करताना श्री भालचंद्र पुजारी व त्यांचे सहकारी



समाजप्रबोधन व भारुड कार्यक्रमास उपस्थित स्वयंसेवक व गावकरी

## ४. **बौद्धिक सत्र दुसरे :**

दिनांक १८ जानेवारी २०२४ गुरुवार रोजी दुपारी ३ ते ४ या वेळेत प्रा. विजय पांडे, प्रा.डॉ.दिनेश काचकुरे व प्रा. भारत कुबेर यांनी 'नोकरी व व्यवसाय' या विषयावर शिबिरार्थीना मार्गदर्शन केले. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी करणे नव्हे किंवा सरकारी नोकरी मिळवण्याचा प्रयत्न करणे नव्हे. शिक्षण म्हणजे जीवन जगण्याचे ज्ञान मिळविणे होय. ज्ञानाच्या जोरावर काहीतरी वेगळे करणे होय. एखाद्या कार्याची सुरुवात करायची असेल तर त्यासाठी काहीतरी ध्येय ठरवावे लागते. त्यासाठी ज्ञान हवे असते. ज्ञानासोबतच आपला स्वभावही चांगला असावा लागतो. त्यामुळे सामाजिक संबंध प्रस्थापित करता येतात. याप्रसंगी प्रा. विजय पांडे यांनी विचार मांडले.

त्यानंतर प्रा.डॉ.दिनेश काचकुरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले आपण काही करण्याअगोदर आपल्याजवळ काय आहे, आपली पात्रता काय आहे, हे ओळखून आपले ध्येय ठरवावे. आपले स्वतःचे निर्णय स्वतः घ्यावेत. पुस्तकी ज्ञानासोबतच सामाजिक ज्ञान असणे गरजेचे असते. शिक्षणासाठी आपली मानसिकता असणे गरजेचे असते. ज्याच्याजवळ ज्ञानाचे भांडार असेल त्याला कधी खाली मान घालावी लागत नाही असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यानंतर प्रा. भरत कुबेर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. जीवनात यशस्वी होण्यासाठी जिद्द, चिकाटी व संयम हे गुण विद्यार्थ्यांच्या अंगी असावे लागतात. मुलाखत या विषयावर विचार व्यक्त करताना ते म्हणाले की मुलाखत म्हणजे ज्ञानाच्या रूपातून आपली प्रतिमा व्यक्त करणे होय, असे विचार त्यांनी व्यक्त केले.




प्रा. विजय पांडे, प्रा.डॉ.दिनेश काचकुरे व प्रा. भारत कुबेर 'नोकरी व व्यवसाय' या विषयावर मार्गदर्शन करताना

## ५. व्याख्यान सत्र दुसरे:

दिनांक १८ जानेवारी २०२४ गुरुवार रोजी व्याख्यान सत्रात सायंकाळी ७:३० ते ८:३० या वेळेत व्याख्याते श्री बाळकृष्ण भारत साळुंके, प्रकल्प समन्वयक युनिसेफ, छत्रपती संभाजीनगर यांनी 'बाल विवाह प्रतिबंध' या विषयावर विचार माडले. बालविवाह म्हणजे समाजाला लागलेली कीड आहे. बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा कृती दल छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासाठी स्थापन केलेले आहे. बालविवाह कायद्यानुसार अठरा वर्षाच्या खालील मुलींचे व 21 वर्षावरील मुलांचे विवाह झाल्यास त्याला बालविवाह असे म्हणतात. बालविवाह केल्यास त्यांच्या पालकांवर गुन्हा दाखल होतो व अटक होते. याबरोबरच विवाहाच्या ठिकाणी ज्यांनी मंडप उभा केला, जे आचारी स्वयंपाक करण्यासाठी होते, त्यांना सुद्धा अटक होते. याबरोबरच फोटोग्राफर, विवाह लावणारा ब्राह्मण, वधू-वरांचे मामा व मराठी मंडळी या सर्वांवर गुन्हा दाखल केला जातो. जबाबदार व्यक्तीला सहा महिने कारावास आणि प्रत्येकी एक लाख रुपये दंड अशी या कायद्याने शिक्षा ठरविलेली आहे. जर आपल्या परिसरात कोठेही बालविवाह होत असेल तर तो आपण थांबवला पाहिजे. मुलाचे वय विवाह करण्यासाठी १८ वर्ष पूर्ण असले पाहिजे. मुला - मुलींचे बालविवाह केल्यास त्यांच्या वैवाहिक जीवनानंतर अनेक शारीरिक समस्या निर्माण होतात. त्यामुळे बालविवाह करू नये असे आवाहन श्री बालकृष्ण भारत साळुंखे यांनी केले.




श्री बाळकृष्ण भारत साळुंके 'बाल विवाह प्रतिबंध' या विषयावर व्याख्यान देताना



श्री बाळकृष्ण भारत साळुंके ‘बाल विवाह प्रतिबंध’ या विषयावर व्याख्यान देताना

## ६. बौद्धिक सत्र तिसरे :

दिनांक १९ जानेवारी २०२४ रोजी शुक्रवार दुपारी ३ ते ४ या वेळेत ‘मुलाखत तंत्र’ या विषयावर प्रा.डॉ. संजीवकुमार पांचाळ व प्रा. डॉ. दत्तात्रय येडले यांनी आपले विचार व्यक्त केले. महाराष्ट्र लोकसेवा आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, बँकिंग क्षेत्रातील मुलाखती कशा घेतल्या जातात याची माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून वेगवेगळ्या पदासाठी वेगवेगळ्या जाहिराती प्रकाशित होतात. त्या अंतर्गत पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा व तोंडी मुलाखत या तीन टप्प्यातून उमेदवार निवडला जातो. यशस्वीपणे मुलाखत देण्याचे तंत्र याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रत्यक्ष विद्यार्थ्यांची मुलाखत घेऊन त्यांना मुलाखतीचे तंत्र समजावून सांगितले. आपण जे पद निवडले आहे त्या पदाविषयी सर्व माहिती मुलाखतीत विचारली जाते त्याचे ज्ञान उमेदवाराला असणे गरजेचे आहे .

‘मुलाखत तंत्र’ या विषयी प्राध्यापक डॉक्टर संजीव कुमार पांचाळ यांनीही आपले विचार व्यक्त केले. मुलाखत हे एक तंत्र आहे. ती एक मोजपट्टी आहे असे ते म्हणाले. यामध्ये आपल्या विचाराचे, आपल्या ज्ञानाचे मोजमाप केले जाते. आपले व्यक्तिमत्व तपासले जाते. मुलाखतीच्या वेळी आपण न घाबरता आत्मविश्वासाने सामोरे जाणे आवश्यक असते. विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देणे आवश्यक असते असे मत पांचाळ यांनी व्यक्त केले.




‘मुलाखत तंत्र’ या विषयावर प्रा.डॉ. संजीवकुमार पांचाळ व प्रा. डॉ. दत्तात्रय येडले यांनी मार्गदर्शन केले

## ७. व्याख्यान सत्र तिसरे :

आरोग्य तपासणी व मार्गदर्शन - शिबिराचा तिसरा दिवस दिनांक १९ जानेवारी २०२४, शुक्रवार रोजी सायंकाळी ७:३० ते ८:३० या वेळेत डॉ. आनंद राठोड, वैधकीय अधिकारी, आरोग्य वर्धिनी, गणोरी यांनी ‘कुपोषण’ या विषयावर गावकरी व स्वयंसेवक यांना मार्गदर्शन केले. आरोग्य वर्धिनी, गणोरी येथील डॉक्टर डॉ. आनंद राठोड व त्यांच्या सोबतचे कर्मचारी श्री. बी. बी. पाटील, वाय. एस. गवळी, श्री संतोष शेळके, श्री देविदास बागुल, श्रीमती सोनाली साळुंखे, श्री अमोल चौतमोल,श्री शिवाजी तायडे, श्री. रामदास राठोड, श्री प्रकाश खळसे, तलवार पठाण यांनी रक्त तपासणी, रक्तदाब, मधुमेह तपासणी करून औषध व गोळयांचे वाटप केले.

कुपोषण या विषयावर मार्गदर्शन करताना डॉक्टर आनंद राठोड म्हणाले, आपल्या शरीराला योग्य वेळी सकस अन्न न मिळाल्यामुळे माणूस कुपोषित होतो. वयाच्या मानाने उंची न वाढणे, उंची प्रमाणे वजन नसणे ही बालकांच्या कुपोषणाची लक्षणे आहेत. बालक गर्भात असताना त्याचे पोषण झाले पाहिजे. आईने त्यावेळी योग्य आहार घेणे आवश्यक असते. जन्मता बालकाचे जर वजन कमी असेल तर बालक कुपोषित असते. जन्म देणारी आई कुपोषित असेल तर बालक सुद्धा जन्म: कुपोषित होऊ शकते. डॉक्टर आनंद राठोड म्हणाले कुपोषण टाळण्यासाठी आईने व्यवस्थित सकस आहार घ्यावा. मुलीचे कमी वयात विवाह करू नयेत. बालकांचे कुपोषण टाळण्यासाठी गरोदरपणात स्त्रीची काळजी घेणे आवश्यक असते. बाळाच्या जन्मानंतर त्याला लवकरात लवकर आईचे दुध पाजावे. किमान सहा महिने बाळाला आईचे दुध देणे आवश्यक असते. त्यानंतर पौष्टिक अन्न द्यावे. वैयक्तिक स्वच्छता राखणे, बाळाचे वेळोवेळी लसीकरण करणे, बाळाचे वजन योग्य आहे का याची तपासणी

करणे आवश्यक आहे. आहारात कडधान्य, दाळी,  पालेभाज्या व फळे हे असली पाहिजेत असे मत त्यांनी व्यक्त केले.



कुपोषण या विषयावर मार्गदर्शन करताना डॉक्टर आनंद राठोड



आरोग्य तपासणी व मार्गदर्शन कार्यक्रमासाठी उपस्थित नागरिक व स्वयंसेवक



आरोग्य तपासणी करताना डॉक्टर



आरोग्य तपासणी करताना डॉक्टर




आरोग्य तपासणी करताना डॉक्टर

## ८. बौद्धिक सत्र चौथे:

शिबिराचा चौथा दिवस दिनांक २० जानेवारी २०२४, शनिवार रोजी दुपारी ३ ते ४ या वेळेत 'पर्यावरण बदल' या विषयावर प्रा.डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी आपले विचार मांडले. पर्यावरण प्रदूषण सतत वाढत चाललेले आहे. त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढत चाललेले आहे. वातावरणामध्ये कार्बन डाय-ऑक्साइडचे उत्सर्जन होत आहे. ओझोन चा थर कमी होत चालला आहे. परिणामी अलीकडील काळात पर्यावरण बदल होत असलेला दिसतो. पर्यावरण बदलाचे गंभीर परिणाम सजीव सृष्टीवर होत आहेत. पर्यावरण प्रदूषण कमी झाल्यास जागतिक तापमान वाढ थांबवता येईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यानंतर महेश थोरात यांनी पर्यावरण बदल यावर आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले आपला विकास शाश्वत असावा, जल, जमीन, जंगल यासह  सजीव सृष्टी यांचे मिळून पर्यावरण बनत असते. माणसाने बुद्धीच्या जोरावर आपला विकास केला आहे. मात्र पर्यावरण प्रदूषणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे अनेक गंभीर समस्या निर्माण झालेल्या आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, वेळीच याला रोकणे आवश्यक आहे असे विचार त्यांनी व्यक्त केले



‘पर्यावरण बदल’ या विषयावर व्याख्यान देताना प्रा.डॉ. मंजुषा नळगीरकर

### ९. व्याख्यान सत्र चौथे:

शिबिराचा चौथा दिवस दिनांक २० जानेवारी २०२४, शनिवार रोजी सायंकाळी ७:३० ते ८:३० या वेळेत “बालकांची तस्करी” या विषयावर ॲड. बाळासाहेब जाधव (तालुका न्यायालय फुलंब्री, जिल्हा व सत्र न्यायालय छ.संभाजीनगर) यांनी विचार मांडले. या व्याख्यान सत्रास गावातील प्रतिष्ठित नागरिक श्री गणपतराव पाटील तांदळे यांची उपस्थित लाभली होती. याबरोबरच कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून गणोरी गावचे ग्रामसेवक श्री प्रभाकर भादवे उपस्थित होते. ‘बालकांची तस्करी’ या विषयावर बोलताना ॲड.बाळासाहेब जाधव म्हणाले महाविद्यालयातील औपचारिक ज्ञानाप्रमाणेच आपण प्रत्यक्षात जीवनशैलीचे ज्ञान मिळविणे आवश्यक आहे. म्हणून राष्ट्रीय सेवा योजना शिबिर आयोजित केले जाते महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये जोश आणि होश या दोन्ही गोष्टी असतात. ते म्हणाले बालकांची तस्करी होण्याच्या घटना अलीकडील काळात वाढलेल्या आहेत. आई-वडिलांनी आपल्या मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे. तस्करी ही एक गंभीर गोष्ट आहे. भारतीय कायद्यानुसार दंडनीय आहे. राज्यघटनेच्या कलम 23 नुसार झिरो ते सोळा वर्षापर्यंत बालकांना कामाला लावता येत नाही. तरीही अनेकदा बालकांची तस्करी करून मुंबई, दिल्ली या सारख्या शहरात तसेच उत्तर प्रदेश, बिहार अशा शहरांमध्ये त्यांना कामाला लावले जाते. बालकाची तस्करी केल्यास संबंधित गुन्हेगारास दहा वर्षाचा कारावास किंवा जन्मठेप होऊ शकते. पाच जूनला नागपूरला 60 बालकांची तस्करी केल्याचे आढळून आले. वारंवार बालकांच्या तस्करीच्या घटना आढळून येत आहेत. बालकांची तस्करी थांबविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने सावध राहिले पाहिजे. बालकांच्या तस्करीला रोखण्यासाठी आपण काळजी घेतली पाहिजे. त्यासाठी शक्य तेवढे काम आपण केले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. या सत्राचा अध्यक्षीय समारोप गणोरी गावचे ग्रामसेवक श्री प्रभाकर भादवे यांनी केला.



‘बालकांची तस्करी’ या विषयावर बोलताना  ॲड.बाळासाहेब जाधव




‘बालकांची तस्करी’ या विषयावर बोलताना  ॲड.बाळासाहेब जाधव

## १०.  बौद्धिक सत्र पाचवे :

दिनांक २१ जानेवारी २०२४, रविवार हा राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा पाचवा दिवस होता. दुपारी ३ ते ४ या वेळेत बौद्धिक सत्रात ‘आरोग्य आणि व्यायाम’ या विषयावर डॉ. संदीप जगताप यांनी स्वयंसेवक व स्वयंसेविका यांना मार्गदर्शन केले. आनंदी जीवन जगण्यासाठी आपले आरोग्य उत्तम असले पाहिजे.  आरोग्य

चागले ठेवण्यासाठी व्यायाम करणे आवश्यक आहे. नियमित व्यायाम ही सुदृढ आरोग्याची गुरुकिल्ली आहे, असे ते म्हणाले.

वाणिज्य विभागातील प्रा. डॉ. स्वप्नील कुलकर्णी यांची यावेळी प्रमुख होती. स्वयंसेवकाना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, त्यांनी तरुणांना करियर करण्यासाठी विविध क्षेत्रात संधी आहेत. कोणत्याही क्षेत्रात करियर करण्यासाठी तरुणांचे आरोग्य चांगले असले पाहिजे. महाविद्यालयीन तरुणांनी व्यायाम करून आपले आरोग्य चांगले ठेवणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

यावेळी सत्राचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयातील वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. महेश थोरात हे उपस्थित होते. त्यांनी पर्यावरण बदलाचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम याविषयी आपले विचार मांडले. पर्यावरण बदलाचा मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. औद्योगिक प्रगतीमुळे हवेत विषारी वायूचे उत्सर्जन होत आहे. वाहने, कारखाने यातून बाहेर पडणारा धूर तसेच कारखान्यातून बाहेर पडणारे रसायनयुक्त पाणी यामुळे हवा, पाणी व माती प्रदूषण होत आहे. प्रदुषणाचा मानवी आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. त्यामुळे आज आरोग्याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे, असे मत प्रा.डॉ. महेश थोरात यांनी व्यक्त केले.




'आरोग्य आणि व्यायाम' या विषयावर डॉ. संदीप जगताप, प्रा. डॉ. स्वप्नील कुलकर्णी,डॉ. महेश थोरात




‘आरोग्य आणि व्यायाम’ या विषयावर डॉ. संदीप जगताप, प्रा. डॉ. स्वप्नील कुलकर्णी,डॉ. महेश थोरात

## ११. व्याख्यान सत्र पाचवे :

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या सहाव्या दिवशी सायंकाळच्या व्याख्यान सत्रासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष फुलंब्री विधानसभा मतदारसंघाचे आमदार व महाराष्ट्राच्या विधानसभेचे माजी अध्यक्ष माननीय श्री हरिभाऊ बागडे नाना उपस्थित होते. त्यांनी शिबिरार्थी व गणोरी गावातील गावकरी यांच्याशी संवाद साधला. प्रारंभी त्यांच्या हस्ते काही सत्कार करण्यात आले. श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयातील विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये वेगवेगळ्या प्रशिक्षणात सहभागी झाले. त्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पूर्व संचालन, राज्यस्तरावर प्रशिक्षण सोलापूर येथे झाले त्यामध्ये महाविद्यालयाची कु. आरती केजभट विद्यार्थिनी सहभागी झाली. राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षणासाठी राखीव म्हणून निवड झाली. त्याबद्दल तिचा सत्कार करण्यात आला. याबरोबरच आव्हान आपत्ती व्यवस्थापन शिबिर गडचिरोली येथे झाले त्या शिबिरामध्ये महाविद्यालयाचे श्री विजय कैलास पेहरकर, सौ. मंजुषा पेरकर व कु. साक्षी दीपक गायकवाड या तीन विद्यार्थ्यांनी आव्हान शिबीर पूर्ण केले त्याबद्दल त्यांचाही सत्कार यावेळी करण्यात आला.

त्यानंतर माननीय श्री हरिभाऊ बागडे नाना यांनी शिबिरार्थी व गावकरी यांना संबोधित केले. याप्रसंगी माननीय श्री हरिभाऊ बागडे नाना म्हणाले, महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या माध्यमातून दरवर्षी वेगवेगळ्या गावांमध्ये ग्रामस्वच्छता, जलसंवर्धन, वृक्षारोपण यासारखे कार्य केले जाते. ग्रामविकासाची प्रेरणा गावकऱ्यांना दिली जाते. श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या मुलांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आतापर्यंत वेगवेगळ्या गावात खूप चांगले कार्य केलेले आहे. या सात दिवसाच्या शिबिरातून विद्यार्थी गावकऱ्याकडून अनेक गोष्टी शिकतात व गावकरी सुद्धा विद्यार्थ्यांकडून काही गोष्टी शिकतात. या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडते. गावकऱ्यांसाठी विविध विषयावर व्याख्याने आयोजित केली जातात. या माध्यमातून गावकऱ्यांच्या ज्ञानात भर पडते. यातून गावाचा विकास होण्यास मदत होते. पुढे ते म्हणाले गणोरी

गावांमध्ये शिबिर संपन्न होत आहे याचा मला आनंद वाटत आहे. याप्रसंगी गावकऱ्यांनी आपल्या मुलांना महाविद्यालयात पाठवावे नियमित महाविद्यालयामध्ये पाठवून शिक्षण घेण्यासाठी प्रेरित करावे अशा प्रकारचे त्यांनी विचार व्यक्त केले.




फुलंब्री विधानसभा मतदारसंघाचे आमदार माननीय श्री हरिभाऊ बागडे नाना शिबिरात मार्गदर्शन करताना




कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. रामकिशन लोमटे




कार्यक्रमाला उपस्थित गावकरी व स्वयंसेवक



कार्यक्रमाला उपस्थित गावकरी व स्वयंसेवक



महाराष्ट्र टाइम्स

# ध्येयासाठी विद्यार्थ्यांनी ज्ञानोपासना करावी

**आमदार हरिभाऊ बागडे यांचे प्रतिपादन**

**म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री**

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या मौजे गणोरी येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या सहाव्या दिवशी 'प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा' आणि 'दीपोत्सवा'च्या निमित्ताने कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी फुलंब्री विधानसभा मतदारसंघांचे आमदार हरिभाऊ बागडे गणोरीतील गावकऱ्यांशी संवाद साधण्यासाठी उपस्थित होते. या वेळी सरपंच सरला तांदळे, उपसरपंच राजेंद्र तांदळे, बाळासाहेब तांदळे, सांडू जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे यांनी केले. तर मनोगत सरपंच सरला तांदळे यांनी व्यक्त केले. या वेळी बोलताना हरिभाऊ बागडे म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी ज्ञानाची कास धरून आपल्या ध्येयाला अभ्यासाची जोड द्यावी. यामुळे विद्यार्थ्यांना अपेक्षित ध्येयापर्यंत पोहचता येईल. यासाठी सतत वाचन करावे.' 'ज्या दिवसाची वाट आपला भारतीय समाज पाहत होता, तो दिवस आज आपण पाहतो आहोत. आजच्या या पावन दिवसाचे खऱ्या अर्थाने आपण साक्षीदार आहोत. त्यामुळे सकल भारतीय बांधवांच्या आनंदाला पारावार उरलेला नाही. या क्षणासाठी आतापर्यंत ७६ लढाया लढल्या गेल्या आहेत. तेव्हा कुठे हा दिवस आपण पाहतो आहोत. हे विसरून चालणार नाही,' असे मत त्यांनी व्यक्त केले. उपस्थित मान्यवरांचे आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. राजश्री पवार यांनी मानले. सूत्रसंचलन कु. ऋतुजा अंभोरे हिने केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. पांडुरंग कल्याणकर, डॉ. संजीवकुमार पांचाळ, डॉ. संदीप जगताप, रत्नाकर जाधव व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

हरिभाऊ बागडे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

## १२. बौद्धिक सत्र सहावे :-

दिनांक २२ जानेवारी २०२४ सोमवार 'संभाषण'या विषयावर गणोरी गावातील गावकरी श्री सोमीनाथ पेहेरकर व श्री पांडुरंग अंभोरे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.






श्री सोमीनाथ पेहेरकर व श्री पांडुरंग अंभोरे स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना

## १३. व्याख्यान सत्र सहावे :

दिनांक २२ जानेवारी २०२४ रोजी श्रीमती सुनिता विटेकर (मुख्याध्यापक जि.प.प्राथमिक शाळा, गणोरी) यांनी सायंकाळच्या सत्रात 'बाल मजुरी' या विषयावर आपले विचार व्यक्त केले. आपण कितीही शिकलो तरी आपण कसे आहोत हे आपल्या वर्तणुकीवरून कळते. १४ वर्षाच्या आतील मुलांना कामाला लावल्यास त्याला बालमजूर असे म्हणतात. बालमजुरी ही आर्थिक परिस्थितीमुळे केली जाते. कुटुंब नियोजन नसल्यामुळे घरातील सदस्यांची संख्या जास्त असते. आर्थिक परिस्थिती कमकुवत असते. या कारणामुळे बालकांना मजुरीला जावे लागते. शहरात बालमजुरीचे प्रमाण वाढत चालले आहे. बालमजुरी रोखण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे. संविधानाने बालकांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिलेला आहे. बालकांना मजुरीला लावणारे जे संबंधित व्यक्ती आहेत. त्यांना कायद्यानुसार शिक्षा होऊ शकते. बालकांना कामाला लावणे हा गुन्हा आहे याविषयी आपण समाजामध्ये जागृती केली पाहिजे असे मत त्यांनी मांडले .




श्रीमती सुनिता विटेकर 'बाल मजुरी' या विषयावर मार्गदर्शन करताना

## १४. 'स्वसंरक्षण' विषयी मार्गदर्शन:-

दिनांक 23 जानेवारी 2024 रोजी सकाळी सहाय्यक श्रीमती आरती जाधव (ए.पी.आय. भरोसा सेल प्रमुख, छत्रपती संभाजीनगर) यांनी 'स्वसंरक्षण' याविषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्वसंरक्षण कसे करावे याविषयी त्यांनी मुलींनाही मार्गदर्शन केले. त्यानंतर शिबिराविषयी बोलताना त्या म्हणाल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिर काय असते हे मला आज या ठिकाणी आल्यानंतर समजले. या ठिकाणी मुली शिबिरामध्ये निवासी आहेत. हे ऐकून मला आज खरोखरच आनंद वाटला. खरे शिबिर काय असते हे आज या ठिकाणी मला समजले असे उद्गार त्यांनी काढले. मुलींनी स्वतःचे संरक्षण स्वतः करायला शिकले पाहिजे, असे त्या म्हणाल्या.




सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती आरती जाधव 'स्वसंरक्षण' याविषयी मार्गदर्शन करताना



सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती आरती जाधव 'स्वसंरक्षण' याविषयी मार्गदर्शन करताना

### १५. शिबिराचा समारोप समारंभ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित व पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था संचालित, श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दिनांक

१७ जानेवारी ते २३ जानेवारी २०२४ या कालावधीत सात दिवशीय राष्ट्रीय सेवा योजना शिबिर गणोरी गावात आयोजित करण्यात आले.

शिबिराचा समारोप समारंभ दिनांक २३ जानेवारी २०२४ रोजी दुपारी २:०० वाजता संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर (जिल्हा समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना), कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले, प्रमुख उपस्थिती गणोरी गावच्या सरपंच सौ. सरलाताई तांदळे तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक श्री पांडुरंग अंभोरे उपस्थित होते. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रामकिशन लोमटे प्रा. डॉ. राजश्री पवार हे उपस्थित होते कार्यक्रमाची प्रारंभी स्वागत गीत झाले. कु. भाग्यश्री शिंदे, कु. निकिता शहरे, कु. शिवानी उबाळे व कु.आकांक्षा शेवाळे यांनी स्वागत गीत सादर केले. कु. ऋतुजा कदम यांनी सुविचार सांगितला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. रामकिशन लोमटे यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातील अनुभव कथन कु. पायल तावरे, कु. साक्षी शेवाळे, श्री चंद्रमणी बनसोडे यांनी केले. या प्रसंगी गणोरी गावचे नागरिक श्री पांडुरंग अंभोरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच गावच्या सरपंच सौ. सरलाताई तांदळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. ज्ञानेश्वर पाथ्रीकर यांनी आपले विचार व्यक्त केले. निवासी शिबिरात सहभागी झाल्याबद्दल स्वयंसेवक व स्व्यासेविकांचे त्यांनी कौतुक केले. शिबिरातील अनुभव आपल्या जीवनात निश्चित उपयोगी ठरतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली. त्यानंतर प्रमुख अतिथीच्या हस्ते शिबिरार्थीना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. शिबिराचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉक्टर सुभाष टकले यांनी केला. आभार कु.आरती केजभट हिने मानले.



शिबिराचा समारोप समारंभ




शिबिराचा समारोप समारंभ मनोगत व्यक्त करताना स्वयंसेवक चंद्रमणी बनसोडे




प्रमाणपत्र वितरण



समारोप प्रसंगी सामुहिक छायाचित्र

**१६. शिबिरातील दैनंदिन उपक्रम - व्यायाम:-** दररोज सकाळी ६:०० ते ७:०० वा.





दररोज ४ कि. मी. धावणे व व्यायाम करताना स्वयंसेवक व स्वयंसेविका





व्यायाम करताना स्वयंसेवक व स्वयंसेविका

**१७. शिबिरातील दैनंदिन उपक्रम - ग्राम स्वच्छता:-** दररोज सकाळी ७ ते ९:०० वा.






ग्राम स्वच्छता  करताना स्वयंसेवक व स्वयंसेविका











**स्वच्छता करताना स्वयंसेवक**

## १८. जनजागृती दिंडी:

दिनांक १७ व २० जानेवारी २०२४ रोजी गणोरी गावात प्रबोधनपर घोषणा देत दिंडी काढली.

**‘विवाहाचा नियम पाळा-मुलींचे बालविवाह टाळा’**

**‘स्वच्छ गणोरी- सुंदर गणोरी’**

**‘झाडे लावा - झाडे जगवा’**

**‘पाणी वाचवा-जीवन वाचवा’**

**‘प्लास्टिक वापराला घाला आळा-पर्यावरणाची हानी टाळा’ अशा घोषणा दिल्या.**







**जनजागृती दिंडी**

## १९. प्रतिष्ठित व्यक्तींची शिबिराला भेट:

सौ. अनुराधाताई चव्हाण सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, फुलंब्री,श्री संतोष पाटील तांदळे व इतर प्रतिष्ठित व्यक्तींनी शिबिराला भेट दिली.




**सौ. अनुराधाताई चव्हाण सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, फुलंब्री यांनी शिबिराला भेट दिली.**




**सौ. अनुराधाताई चव्हाण यांनी मुलींच्या निवास स्थानी भेट दिली**

## २०. शिबिरातील दैनंदिन उपक्रम -श्रमदान:





जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे श्रमदान केले





गावात विविध ठिकाणी श्रमदान केले




गावात विविध ठिकाणी श्रमदान केले

## २१. वृक्ष दिंडी व वृक्षारोपण:

**गणोरी गावात दिनांक २० जानेवारी २०२४ रोजी वृक्ष दिंडी काढली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण केले.**






**वृक्ष दिंडी**





**जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण केले**

**२२. पथनाट्य:** गणोरी येथील आठवडी बाजारात सहा ठिकाणी ‘बचत पाण्याची समृद्धी जीवनाची’ पथनाट्य सदर केले.




**आठवडी बाजारात सहा ठिकाणी ‘बचत पाण्याची समृद्धी जीवनाची’ पथनाट्य सदर करताना विद्यार्थी**




**गणोरी येथील आठवडी बाजारात सहा ठिकाणी ‘बचत पाण्याची समृद्धी जीवनाची’ पथनाट्य सदर केले**



**गणोरी गावात विविध ठिकाणी 'बचत पाण्याची समृद्धी जीवनाची' पथनाट्य सदर केले**



**गणोरी गावातील प्राथमिक शाळेत 'बचत पाण्याची समृद्धी जीवनाची' पथनाट्य सदर केले**

**२३. सर्वेक्षण – 'हवामान बदलाचा गणोरी गावातील पिक परिस्थितीवर झालेला परिणाम' यावर सर्वेक्षण करण्यात आले.**



**सर्वेक्षण- गावकऱ्यांकडून प्रश्नावली भरून घेतली**

**= o =**